



Anusandhanvallari
Vol 2023, No.1
January 2023
ISSN 2229-3388

# चांदागड येथील गोंड कालीन स्थापत्य कला

अशोक नानाजी नैताम

संशोधक

इतिहास विभाग

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

मार्गदर्शक

डॉ. एस. आय. कोरेटी

इतिहास विभाग प्रमुख

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**सारांश**

चांदागड म्हणजे आजचे चंद्रपूर होय. या ठिकाणी गोंड घराण्याची सत्ता होती. या घराण्याचा पाया शिरपूर या ठिकाणी इसवी सनाच्या नवव्या शतकात रचला गेला. या घराण्यातील पहिले गोंड राजे भीम बल्लाळसिंह होते. या घराण्याने इ.स. १७५१ पर्यंत राज्य केले. या भूप्रदेशामध्ये स्थापत्यकलेतील विकासात्मक कामे करण्यामध्ये गोंड घराण्याचे मोठे योगदान आहे. गोंड घराण्यांनी मध्य भारतातील चंद्रपूर भूप्रदेशात अनेक मंदिरे, किल्ले व तलाव निर्माण केली. गोंड घराण्याची स्थापत्यकला गोंडी स्थापत्य शैलीतील होती. या घराण्याने दक्षिण व उत्तर भारतातील स्थापत्य कला अभ्यासली होती. या दोन्ही स्थापत्यकलेच्या मिश्रणातून स्वतःची एक नवीन स्थापत्य कला निर्माण करून, ती स्थापत्यकला चांदा भूमीत रुजवली. या स्थापत्य कलेच्या आधारावर चांदागड राज्यामध्ये अनेक ठिकाणी वास्तू निर्माण केल्या. या शोध निबंधाच्या आधारे चांदागड या भागातील स्थापत्य कलेचा अभ्यास करण्यात आला आहे.

बीजशब्द : गोंडी, बावड़ी, समाधी ,गोंड ,चांदा

प्रस्तावना

गोंड ही जमात प्राचीन कालखंडापासून मध्य भारतात निवास करणारी जमात आहे. या जमातीने इसवी सनाच्या नवव्या शतकामध्ये शिरपूर या ठिकाणी गोंड घराण्याचा पाया घातला. त्यानंतरच्या कालखंडामध्ये या घराण्याचा विस्तार मध्य भारतातील महाराष्ट्रातील चंद्रपूर, यवतमाळ जिल्ह्यातील काही भागात,गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर जिल्ह्याचा काही भाग, नांदेड जिल्ह्याचा काही भाग, तेलंगणा राज्याच्या काही प्रदेश, छत्तीसगड राज्यातील काही प्रदेश या भागापर्यंत झाला. या घराण्याने साम्राज्य विस्ताराचे धोरण अवलंबिले असल्यामुळे राज्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. राज्याच्या विस्ताराबरोबर चांदा येथील गोंड राजांनी या भागामध्ये स्थापत्य कलेचा विकास घडवून आणला. राज्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने चांदा भूप्रदेशामध्ये अनेक किल्ल्यांची निर्मिती केली. या भागामध्ये बाहेरील लोकांना आश्रय दिल्यामुळे धार्मिक भावना जोपासण्यासाठी मंदिराची निर्मिती केली. हा प्रदेश घनदाट अरण्याने व्यापलेला होता. अरण्याची तोड करून शेती निर्माण करण्यात आली. शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी तलावाची

निर्मिती करण्यात आली होती. तलावाची निर्मिती करण्यासाठी गोंड राजांनी उत्तर भारतातील कोहळी समाजाला आणले होते. या प्रदेशामध्ये अनेक ठिकाणी बावडी व विहिरी निर्माण करण्यात आल्या.

मध्य भारताच्या इतिहासामध्ये गोंड साम्राज्याचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. विदर्भातील चंद्रपूर (चांदा) राज्य गोंड राजांच्या वैभवशाली कालखंडाचे साक्ष देणारे प्रमुख केंद्र राहिले आहे. इ.स. ९ व्या शतकापासून ते १८ व्या शतकापर्यंत या प्रदेशावर गोंड राजांचे वर्चस्व होते. या काळात त्यांनी केवळ राज्यविस्तारच केला नाही, तर एक विशिष्ट आणि अभेद्य अशी 'गोंडी स्थापत्यशैली' विकसित केली. राज्याच्या प्रगतीबरोबर स्थापत्य कलेत सुध्दा प्रगती केल्याचे दिसते.

गोंड घराण्याची स्थापत्य कला गोंडी स्थापत्य शैलीतील होती. या स्थापत्यशैलीच्या आधारे किल्ल्याची निर्मिती केली गेली. किल्ल्याच्या निर्मितीसाठी त्या भागातील दगडांचा आणि मातीचा वापर केला. गोंड घराण्याच्या स्थापत्य शैलीत वेगळेपणा दिसून येते. इतर भागांमध्ये असणाऱ्या वास्तू आणि गोंड राज्यात असणाऱ्या वस्तू यामध्ये काही प्रमाणात साम्य दिसून येते. याचे कारण असे की गोंड राजांनी उत्तर व दक्षिण भारतातील स्थापत्यकला अभ्यासली होती. या भागात येणारा कारागीर वर्ग हा दुसऱ्या ठिकाणाहून आयात केला जात होता. त्यांच्याच मदतीने गोंड राजांनी आपल्या चांदा राज्यातील वास्तु बांधून घेतल्या. गोंड राजांनी निर्माण केलेल्या स्थापत्य कलेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी हिंदू व मुस्लिम धर्माची स्थापत्य कला अभ्यासली होती. या दोन्ही धर्माच्या स्थापत्य कलेच्या समिश्रनातून स्वतःची वेगळी स्थापत्य कला निर्माण केली होती.

**संशोधनाचा उद्देश**

१.चांदागड राज्यातील मंदिर स्थापत्य कला अभ्यासणे.

२.गोंड राज्यातील किल्ले स्थापत्यकाला अभ्यासणे.

३.गोंड घराण्याची समाधी व जल स्थापत्यकला अभ्यासणे.

४.गोंड घराण्यातील स्थापत्य कलेला ओळख मिळवून देणे.

५.गोंड राजवंशातील गोंडी स्थापत्य शैली समजून घेणे.

**विश्लेषण**

**किल्ले स्थापत्य कला**

गोंड घराण्याच्या राजवटीत चांदा भूप्रदेशात अनेक किल्ले व गढ्या निर्माण झाल्या होत्या. चांदा राज्यात किल्ले बांधणीची सुरुवात दहाव्या शतकापासून झाल्याचे दिसून येते. सुरुवातीच्या कालखंडामध्ये किल्ल्याचे बांधकाम पाषाणाचा व मातीचा वापर करून केला. मातीला आग देऊन भिंती मजबूत केल्या. आतील वास्तूच्या बांधकामासाठी सागवान वृक्षाच्या लाकडाचा वापर केल्याचे दिसते. इसवी सनाच्या दहाव्या ते बाराव्या शतकापर्यंत अशा पद्धतीचे किल्ले बांधणी दिसून येते. या कालखंडातील किल्ले आज पूर्ण नष्ट झाली आहेत. फक्त त्यांचे भग्न अवशेष दिसून दिसतात. बाराव्या शतकानंतर चांदा येथील गोंड घराण्याच्या राजाने दक्षिण व उत्तर भारतातील किल्ले स्थापत्यकल्या अभ्यासल्याचे दिसते. या कालखंडात निर्माण झालेले किल्ले मजबूत स्वरूपाचे होते. उत्तर भारतातून राजा सुरजा बल्लाळशहा यांनी अनेक कारागीर सोबत आणले होते. त्यांच्या मदतीने किल्ल्याचे बांधकाम करून घेतले.

गोंड राजवंशातील किल्ले स्थापत्य कला गोंडी स्थापत्य शैलीला धरून समिश्र स्वरूपातील होती. यात उत्तर व दक्षिण भारतातील किल्ले स्थापत्य शैलीचा प्रभाव दिसून येतो. गोंड घराण्यातील किल्ले हे विशेष करून डोंगरी भागात होते. भुईकोट व गिरीदुर्ग प्रकारातील किल्ले बांधल्याचे दिसून येतात. गोंड कालखंडात निर्माण झालेल्या किल्ल्याची रचना ही निसर्गाला अनुसरून होती. किल्ल्याची बांधणी करताना मजबूत तटबंदी निर्माण केली. तटबंदीच्या बांधकामासाठी गोंड राजांनी प्रसिद्ध असलेल्या कापेवार समाजाला आंध्र प्रदेशातून बोलावून आश्रय दिला. या समाजाचे तटाचे केलेले बांधकाम इतके मजबूत आहे की ऊन, वारा, पाऊस व तोपाचा मारा यांना तोंड देऊन तो तट व त्याच्या भव्य वेशी आजही कायम टिक धरून आहेत. तटबंदीच्या बाहेर काही ठिकाणी खंदक निर्माण केले. किल्ल्याच्या आतील भागात राणी महल, राजमहल, दासी निवास, सैन्य निवास, धान्य कोठार, घोड्यांचा पांगा, शस्त्रास्तगार, बावडी, विहिरी, जलकुंड, स्थान कुंड, भुयारी तळघरे, भुयारी मार्ग इत्यादी वास्तू बांधल्याचे दिसून येतात. तटबंदीला मजबुती देण्यासाठी बुरुजे निर्माण केली. ही बुरुजे गोलाकार स्वरूपाची होती.

गोंड राजवंशातील किल्ल्यांची निर्मिती करायला प्रदीर्घ कालखंड लागल्याचे दिसते. उदा चंद्रपूरचा किल्ला बांधायला दीडशे वर्षे लागली होती. म्हणजे सहा पिढ्यापर्यंत काम चालू होते.


जस जसा काळ पुढे गेला, तस तसे स्थापत्यरचने बदल होत गेले. येणाऱ्या प्रत्येक राज्यांनी किल्ले प्रशासन घटकावर लक्ष दिले. किल्ले हे श्रीमंतीचे लक्षण होते. ज्या राजाकडे सर्वाधिक किल्ले तो राजा बलशाली समजला जात होता. नात्यातील व्यक्तीची किल्लेदार म्हणून नेमणूक करीत असे. या किल्ल्यास राखीव सैनिक तुकडी ठेवल्या जात असे. या घराण्याने चांदागड राज्यात ६० ते ७० गढ्या आणि किल्ले बांधल्याचे दिसून येतात. स्थापत्य कलेच्या दृष्टीने हे किल्ले भारतीय इतिहासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजाते. शत्रू आणि हिंस्र पशुपासून सुरक्षा करण्यासाठी राजाने लोकांना किल्ल्याच्या आत सामावून घेतले होते. चांदा नगरी ही किल्ल्याच्या आत होती. गोंड घराण्याच्या किल्ले स्थापत्य कलेचा अभ्यास करताना प्रकर्षाने जाणवते की, येथील गोंड राजे दूरदृष्टीचे होते. किल्ल्याची भौगोलिक रचना ही निसर्गाला अनुसरून होती. ज्या ठिकाणी मुबलक जलसाठा आहे अशाच भागात किल्ले बांधले. उदाहरण द्यायचे झाल्यास टीपागड किल्ला. घनदाट जंगलात आहे. तिथे पाण्याचा साठा मुबलक प्रमाणात आहे. या ठिकाणी नैसर्गिक तटबंदी दिसून येते. प्रत्येक राजाने किल्ले स्थापत्य कलेची परंपरा जपली.

**समाधी स्थापत्य कला**

गोंड घराण्यात मृत्यू संस्काराला फार महत्त्व होते. एखाद्या राजाचा मृत्यू झाल्यानंतर त्याला गोंडी परंपरेनुसार दफन केल्या जात होते. या राजाची स्मृती जनसमुदायांमध्ये टिकून राहावी यासाठी समाध्या निर्माण केल्या. ही परंपरा गोंड वंशातील प्राचीन परंपरा आहे. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्या ठिकाणी स्मृतीशिळा उभारणे. समाधीच्या आत स्मृतीशिळा बांधली. हडवाड्यातील समाधी स्थळे हे उदाहरण आहे. या ठिकाणी असणाऱ्या प्रत्येक समाधीमध्ये गोंडी स्थापत्य कलेची झलक दिसून येते. समाध्यांच्या निर्मितीसाठी वालूकामय पाषाणाचा वापर केला. जुडाईसाठी डिंक, बेल, मुंग डाळ, झाडांचा रस यांचे मिश्रण वापरले. सोबतच चुन्याची चिरेबंदी दिली. अनेक शतके उलटली तरी आजही या समाध्या चांगल्या स्थितीत आहे. यावरून लक्षात येते की गोंड घराण्याची समाधी स्थापत्य कला किती प्रगत असावी. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे राजा बिरसिंग यांची समाधी. ही समाधी सर्वात उंच आहे. याची स्थापत्य रचना समिश्र प्रकारातील आहे. हिंदू, मोगल, राजपूत व गोंडी स्थापत्य शैलीतील ही समाधी दिसते. ही वास्तू शोभून दिसावी यासाठी या समाधीला अलंकरण केल्याचे दिसते.

**जल स्थापत्य कला**

हा भाग घनदाट अरण्याने वेढला होता. प्रथम या ठिकाणी वसाहतीकरण करण्यासाठी बाहेरील लोकांना उत्तेजन दिले. यांच्याकडून जंगले तोडून शेती करायला प्रोत्साहन दिले. राज्यात शेतीची भरभराट व्हावी, यासाठी ठिकठिकाणी तलाव बांधून पाणीपुरवठ्याची






सोय उपलब्ध केली. लोकांच्या सहभागातून तलावे व बोडी निर्माण करण्यासाठी तुकुमदारी पद्धती चालू केली. यातून पुढे हजारो तलाव आणि बोड्या निर्माण झाल्या. डोंगराच्या उतरणीच्या भागात अनेक तलावे बांधले गेले. उत्तम उदाहरण म्हणजे नवेगाव बांध येथील गोंड कालीन तलाव होय. तलावाचे बांधकाम फक्त शेतीपूरते मर्यादित न ठेवता त्याचा व्याप वाढवला. जंगलातील प्राण्यांना सुद्धा पाण्याची सोय उपलब्ध व्हावी यासाठी जंगलाच्या मध्यभागी तलाव निर्माण केली. उदा ताडोबा तलाव.


राजा सुरजा बल्लाळशहा यांनी उत्तर भारतातील जल व्यवस्थापन स्थापत्यकलेचा अभ्यास केला. बल्लारशा राजधानीत परत येताना तलाव, बावडी व विहीर बांधणारे कारागीर म्हणजे कोहळी समाजाला सोबत आणले. त्यांच्या मदतीने हजारो बावड्या, विहिरी व तलावे बांधून घेतली.

वाटसरूच्या पाण्याचा प्रश्न मिटवण्यासाठी मुख्य मार्गावर बावड्या बांधल्या. या बावड्या जल स्थापत्य कलेतील उत्तम उदाहरण आहे. याची रचना गोंडी स्थापत्य शैलीला अनुसरून होती. या बावड्या पाषाणाचा वापर करून बांधलेल्या दिसते. यात मनुष्य असो वा प्राणी प्रत्येकांना खाली उतरून पाणी पिता येते. आराम करण्यासाठी खोल्या सुद्धा या बावडीमध्ये तयार केल्या. यातून सैनिकाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुध्दा सुटला. या बावड्यांचा वापर सैनिक सुद्धा करत होते. चंद्रपूर या राजधानीच्या ठिकाणी लोकांची संख्या वाढली होती. त्यांना पाण्याचा पुरवठा व्हावा, म्हणून मातीचे भाजलेले पाईप जमिनीत गाळून जागोजागी पाण्याच्या साठ्याकरिता 'हतनी' बांधल्या व अनेक ठिकाणी बावड्या बांधल्या. गोंड राज्याच्या काळात चांदा राज्यात जल स्थापत्याची अतुलनीय प्रगती झाल्याचे दिसते. त्यांच्या कालखंडात निर्माण झालेले तलावे बावड्या व विहिरी आजही दिसते.

**मंदिर स्थापत्य कला**

गोंड राजवंशाच्या काळात चांदा राज्यात वेगवेगळ्या राजांच्या कालखंडात एक अनेक मंदिरे बांधल्या गेली. सर्वधर्मीयांच्या भावना जोपासण्यासाठी मंदिर एक केंद्र होते. चांदा राज्यात कापेवार व कोमटी समाज मंदिर बांधण्यासाठी अग्रेसर होता. यांच्या सहकार्याने मंदिरे बांधून घेतली. आज या भागात कापेवार समाज मोठ्या संख्येने दिसते त्याचे कारण म्हणजे येथील राजवटीने त्यांच्या शिल्पकलेला दिलेला राजाश्रय होय. तेलंगानातून येऊन स्थानिक झालेल्या ब्राह्मणांनी धर्मजागृती केली. गोंड राजाने ब्राह्मणांना राजाश्रय दिल्याचे दिसते. याशिवाय चांदा राज्यात विद्वान, वैदिक व साधुसंत ही बरेच झाले. या सर्वांनी जनसामान्यांना जागृत करून धार्मिक वळण लावले व विशिष्ट प्रकारे सांस्कृतिक कार्य केले. तात्पर्य असे की, गोंड राजवटीचा काळ हाच दक्षिण गोंडवनाच्या उत्कर्षाचा काळ होय.

या चांदा भागात आढळणारी मंदिरे हेमाडपंती शैलीतील दिसून येतात. गोंड राजे हे बुढालपेनचे म्हणजे महादेवाचे भक्त होते. या भागात अनेक शिवमंदिरे आणि शिवपिंड निर्माण केल्याचे दिसते. गोंड घराण्याची मंदिर स्थापत्यकला अद्वितीय होती. यांची मंदिर रचना गर्भगृह, सभा मंडप, अंतराल, मुख्य मंडप, स्तंभ, शिखर, कळस अशा स्वरूपाची असल्याचे दिसून येते. मुख्यमंडप आणि सभामंडप यांच्या स्तंभांवर बाह्य भागात नृत्य गणेश, भैरव, पार्वती, नृत्यांगना, मृदुंगवादक स्त्री, नटराज, सरस्वती, वीरपुरुष आदी मूर्ती कोरलेल्याचे दिसून येते. मंदिराच्या गर्भगृहावरील शिखर नागर शैलीतील ३ शाखायुक्त रचनेचेतील दिसतात. मंदिराच्या बांधकामासाठी वाळलूकामय पाषाणाचा तसेच काळ्या पाषाणाचा वापर केल्याचे दिसते. विशेष करून ही मंदिरे तलावाच्या काठी बांधली. चांदा राज्यात विविध कालखंडात प्रत्येक राज्यांनी मंदिरे उभारल्याचे दिसून येतात. मंदिराचे अलंकरण गोंडी स्थापत्यशैलीनुसार केल्याचे दिसते. निसर्गातील सर्व घटकांचा समावेश करून घेतला असे दिसते. गोंडवन भूमीतील मंदिरे प्राचीन कालखंडापासून आहे. गोंड राजांनी अकराव्या शतकापासून मंदिरे निर्माण करायला सुरुवात केली. त्याची ओळख म्हणजे मंदिरावरती गोंड घराण्याचे राज चिन्ह 'हत्तीवर आरुढ सिंह' होय.





फक्त चंद्रपूर शहराचा विचार केला असता या ठिकाणी महाकाली व अंचलेश्वर भव्य मंदिर आहे. या मंदिरावरती अनेक मूर्ती शिल्पे कोरल्याचे दिसून येतात. या मूर्ती शिल्पाच्या माध्यमातून धार्मिक संदेश देण्याचा प्रयत्न गोंड राजवटीने केल्याचे दिसून येतात. अंचलेश्वर मंदिराच्या खालील भागात कोरलेले १८० किर्तीमुख आहे. या प्रत्येक किर्तीमुखात भावना व्यक्त केल्याचे दिसते. ह्यातील प्रत्येक शिल्पावर वेगवेगळी भावना प्रकट केल्याचे दिसून येतात. लालपेठेतील मूर्ती समूह बघितला असता यातून जाणवते की, हे जर मंदिर उभे झाले असते तर संपूर्ण भारतातील एकमेव भव्य दिव्य मंदिर राहिले असते. या ठिकाणी असणाऱ्या भग्न मुर्त्या याची साक्ष करून देते. शिल्पकाराचे अकाली निधन यामुळे या मंदिराचे कार्य अपुरे राहिले. चांदा भागात जोड मंदिरे बांधण्याची परंपरा गोंड कालखंडातच सुरुवात झाल्याचे दिसतात. प्रत्येक परगण्यामध्ये भगवान महादेव आणि त्यांची शिवपिंड स्थापन केल्याचे दिसून येतात. मंदिराच्या दिवाबत्तीच्या खर्चासाठी गोंड राजांनी अनेक ठिकाणी भूमी दान दिल्याचा उल्लेख आढळून येतो.

**निष्कर्ष**

गोंड राजांनी चांदाभूमीला एक नवीन अध्याय दिला. मध्ययुगीन कालखंडामध्ये चांदा राज्याचा विकासामध्ये गोंड राजांचा सिंहाचा वाटा आहे. यांनी या भागाची प्रगती करण्यासाठी अनेक विकासात्मक कामे केल्याचे दिसून येतात. प्रकर्षण उल्लेख करावासा वाटतो की, गोंड राजे हे मध्य भूमीचे निर्मातेच होते. चांदागड येथील गोंडकालीन स्थापत्यकला हे केवळ दगड-विटांचे बांधकाम नसून, तो एका समृद्ध संस्कृतीचा वारसा आहे. गोंड राजांनी विकसित केलेली ही शैली मध्ययुगीन भारतीय स्थापत्यात आपले वेगळेपण टिकवून आहे. मात्र, काळाच्या ओघात या वास्तूंचे जतन करणे ही आजची मोठी गरज आहे.

**संदर्भसूची**

१ . इंडिया ऑफिय लायब्ररी लंडन, मेन्यु स्फिप्ट क्र. ४४ दर्याप्ती कैफियत चंद्रपूर फो. १८२०

२ . कनिंगहॅमन, आर्किऑलाजीकल सर्व्हे ऑफ इंडिया, रिपोर्ट,व्हॅल्यूम,१,३, ९,७,२१,२३ १८७३-७४,१८७४-७५, कोलकाता १८७९

३ . Major Lucie Smith, Settlement Report of Chanda District, 1869

४ . ब्राऊन,सी ऍन्ड रसेल, आर. वि. यवतमाळ डिस्टिक गॅझेटियर १९०८

५ . बेग्बी, एल. एफ. चांदा डिस्ट्रिक्ट गॅझेटियर १९०९

६ . रसेल, आर.व्ही, भंडारा जिल्हा गॅझेटियर, १९०८

७ . पारखी.सिताराम, चांदा-चंद्रिका


८ . राजूरकर अ.ज., चंद्रपूरचा इतिहास, महाकाली प्रकाशन चंद्रपूर, द्वितीय आवृत्ती,१९८२

९ . काटकर तु.ना, चंद्रपूर नगरपालिका शताब्दी ग्रंथ, चंद्रपुर नगर परिषद, १९६७

१०. टेंभेकर नलिनी खे, पूर्व विदर्भातील ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळे, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर, २०१०

११ . किदार नाथ थुसू, गोंड किंग्डम ऑफ चांदा, अँथ्रोपोलॉजी सर्वे ऑफ इंडिया. २०१०

१२ . हेन्री कझिन्स, इन्सक्रिप्शन फ्राम सि.पी.ॲन्ड बेरार १९०८






१३ . आर्किऑलाजीकल सर्व्हे ऑफ इंडिया, लिस्ट ऑफ एण्टीक्युरी खंड ९ १९०८-०९

१४ . मिश्र, सुरेश, गद्रे प्रभाकर, चांदा का गोंड राज्य, राजकमल प्रकाशन नई दिल्ली, पहला संस्करण, २००८

१५ . दिक्षित,मो. ग,  मध्यप्रदेश में पुरातत्त्व की रूपरेषा, सागर, १९५४

१६ . श्री रविशंकर शुक्ल अभिनंदन ग्रंथ, १९५५

१७ . सांकलिया ह.धी., भारतीय पुरातत्त्व एक समालोचन, मुंबई १९८९